# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.12.2025** **वार- मंगळवार**

---

**राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत विज्ञान भवनात राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्राध्यापक जयंत नारळीकर यांचा या वेळी मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कारानं सन्मान करण्यात आला.

**राष्ट्रीय कला महोत्सव**

विद्यार्थ्यांनी विकसित भारताच्या ध्येयासाठी कलेसोबतच तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन प्रयोग करावेत, असं आवाहन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार यांनी आज पुण्यात केलं. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभाग आणि श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी यांच्यावतीनं आयोजित राष्ट्रीय कला महोत्सव 2025 च्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रश्न विचारण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहन द्यावे जेणेकरून विद्यार्थी आपल्या कल्पकतेने शिकतील असेही संजय कुमार यावेळी म्हणाले.

**पुणे-प्राप्तिकर विभाग**

पुणे प्राप्तिकर विभागाच्या प्रधान मुख्य प्राप्तिकर आयुक्तपदी आदर्श कुमार मोदी यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी पदभार स्वीकारला असून त्यांच्याकडे नागपूर प्राप्तिकर विभागाचा प्रधान मुख्य प्राप्तिकर आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभारही देण्यात आलेला आहे.

**प्राप्तीकर-विभाग**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये पैशांच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी पुणे प्राप्तीकर विभागानं चोवीस तास सुरू राहणारा नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. निवडणूक काळात बेहिशेबी रोकड, मौल्यवान वस्तु किंवा इतर प्रलोभनांबाबत नागरिकांनी जागरुक राहावं आणि 1800-233-0701 या टोलफ्री क्रमांकावर अथवा 94-05-41-72-31 या व्हॉटस् ऍप क्रमांकावर माहिती द्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**उमेदवारी अर्ज**

राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरु झाली. या निवडणुकीसाठी 30 डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जातील आणि 31 डिसेंबरला अर्जांची छाननी होईल.

2 जानेवारी 2026 पर्यंत उमेदवारांना माघार घेता येईल. 3 जानेवारीला निवडणूक चिह्नांचं वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. 15 जानेवारीला मतदान होणार असून 16 जानेवारीला मतमोजणी होईल.

**<u>पुणे-प्रशासन तयारी</u>**

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी 15 निवडणूक निर्णय अधिकारी तसंच 45 सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले असून सर्व कार्यालयांची ठिकाणं निश्चित करण्यात आली आहेत. निवडणूक कामकाजासाठी 22 कक्ष स्थापन करून नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. उमेदवारांना ना-हरकत आणि थकबाकी प्रमाणपत्र तसेच प्रचार परवाने मिळण्यासाठी एक खिडकी कक्ष आणि ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी 160 पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. 41 प्रभागांतील 4 हजार 12 मतदान केंद्रांसाठी सुमारे 23 हजार कर्मचाऱ्यांना आदेश जारी करण्यात आले आहे.

**<u>मतदान जनजागृती मोहीम</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिका हद्दीत स्वीप अंतर्गत व्यापक मतदान जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत महापालिकेच्या शाळांमध्ये 'प्रिय आई बाबा, पत्रास कारण की...' हा उपक्रम राबविण्यात येत असून, त्याची सुरुवात आज पीएम श्री माध्यमिक विद्यालय, थेरगाव इथं उत्साहात झाली. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळकरी मुले त्यांच्या आई-वडिलांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगणारे एक पत्र देणार आहेत. विशेषतः विद्यार्थ्यांच्या माध्यमातून कुटुंबांपर्यंत मतदानाचे महत्त्व पोहोचवण्याचा हा अभिनव उपक्रम असून, यामार्फत महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांद्वारे सुमारे 58 हजार पालकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यात येणार आहे, शहरातील महापालिकांच्या शाळांमध्ये दररोज टप्प्याटप्प्याने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

**<u>पुणे-पिंपरी चिंचवड -एनसीपी</u>**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत शरद पवार आणि अजित पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रितरित्या निवडणूक लढवू शकतात, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली.

**<u>पुणे-भाजपा-प्रवेश</u>**

पुणे शहरातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक पृथ्वीराज सुतार आणि संजय भोसले यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राहुल कलाटे यांनी आज मुंबई इथं भाजपात प्रवेश केला. पुण्यातील वैभव वाघ यांची शिवसेनेच्या प्रभारी 'निवडणूक राज्य समन्वयकपदी' नियुक्ती करण्यात आली आहे. तसंच धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षांच्या 'राज्य कक्ष प्रमुख' पदाचीही जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली आहे.

**<u>उस-गाळप</u>**

महाराष्ट्रात 190 साखर कारखान्यांनी आतापर्यंत 379 लाख टन उसाचं गाळप करून सरासरी सव्वा आठ टक्के उताऱ्यासह 31 लाख 30 हजार टन साखरेचं उत्पादन केलं आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत

झालेल्या साखर उत्पादनाच्या तुलनेत यंदा उत्पादनात 16 लाख 80 हजार टनांच्या वाढ नोंदवण्यात आल्याचंही महासंघाकडून सांगण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात थंडीचा कडाका कायम आहे. आज पुण्यात 8 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. उद्या किमान तापमान 9 अंशाच्या आसपास राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता. ताज्या पुणे वृत्तांतसह नमस्कार.**